




दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

**वर्ष : ०४**, अंक : २२३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.२५ मार्च २०२५







## फुले दाम्पत्याला मरणोत्तर भारतरत्न, विधानसभेत ठराव संमत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, चंद्रपूर :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न या सर्वोच्च उपाधीने सन्मानित करण्याबाबत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत मांडलेला ठराव पारित करण्यात आला.



भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे. एखाद्या क्षेत्रात असाधारण आणि सर्वोच्च कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. राजकारण, कला, साहित्य आणि विज्ञान क्षेत्रातील विचारवंत, शास्त्रज्ञ, उद्योगपती, लेखक आणि समाजसेवक यांना या पुरस्काराने गौरवण्यात येते.क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी उपेक्षित, वंचितांच्या जीवनात समृध्दीचा प्रकाश निर्माण करत, सामाजिक न्यायासाठी आयुष्य खर्ची घालून, अस्पृश्यता निवारण आणि स्त्री शिक्षणासाठी संघर्ष केला आहे.

त्यामुळे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानीत करावे तसेच राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव, भारत सरकारकडे पाठवावा, असे या ठरावात म्हटले आहे. महाराष्ट्र विधानसभा नियमांच्या नियम ११० नुसार, महाराष्ट्र विधानसभा याद्वारे, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानीत करण्याची शिफारस भारत सरकारला करीत आहे, असे देखील या ठरावात म्हटले आहे. हा ठराव आज विधानपरिषदेत मांडण्यात येणार आहे.

७ मार्च रोजी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत वरील मागणीच्या अनुषंगाने अशासकीय ठराव मांडला व चर्चा घडवून आणली. याविषयी विधिमंडळात ठराव पारित करून तो केंद्र शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले होते. या आश्वासनाची पूर्तता महायुती सरकारने केली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील विधानसभा सदस्यांचे शिष्टमंडळ राष्ट्रपतींच्या भेटीसाठी नेणार असल्याचे आश्वासन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

## तीन वाघ आणि एका बिबट्याचा मृत्यू बर्ड फ्ल्यू मुळे - वनमंत्री

**अक्षराज : जे. के पोळ**

**दि.२४, ठाणे :** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे प्राणी संग्रहालय (गोरेवाडा), नागपूर येथील तीन वाघ आणि एका बिबट्याचा मृत्यू बर्ड फ्ल्यू मुळे झाला असल्याची माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. सदस्य मनीषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री नाईक बोलत होते.

गोरेवाडा येथील प्राणी संग्रहालयात विषाणूजन्य आजारामुळे प्राण्याचा मृत्यू होऊ नये म्हणून उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगून वनमंत्री नाईक म्हणाले की, बाधित प्राण्यांचे पिंजरे निर्जंतुक करण्यात आले आहेत.

प्रचलित नियमांतील तरतुदीनुसार मृत प्राण्यांचे मृतदेह नष्ट करण्यात आले आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना पीपीई किट उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना अन्य क्षेत्रात जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी कोंबडीच्या मांसाचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. राज्यात पशुवैद्यकीय अधिकारी यांची पदे कमी असल्याच्या पार्श्वभूमीवर मंत्री कार्यालयामध्ये विशेष कार्य अधिकारी म्हणून रुजू असलेल्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांबाबत माहिती घेवून निर्णय घेण्यात येईल, अशी माहितीही वनमंत्री नाईक यांनी दिली.

## थोडक्यात

### प्रशांत कोरटकरला अटक

**दि.२४, नागपूर :** छ.शिवाजी महाराज व छ.संभाजी महाराज यांच्याविषयी आक्षेपार्ह बोलून इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना शिवीगाळ करणाऱ्या तथाकथित पत्रकार आरोपी प्रशांत कोरटकरला पोलिसांनी तेलंगणातून अटक केली. तो गेल्या चार दिवसांपूर्वीच चंद्रपुरातील एका हॉटेलमध्ये मुक्कामी होता. तेथून तो थेट तेलंगणात पळाला होता. मात्र, कोल्हापूर पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन तेलंगणातून अटक केली.प्रशांत कोरटकरविरोधात नागपूर, कोल्हापूर व जालना येथे गुन्हे दाखल झाले आहेत. न्यायालयाने अटकपूर्व जामीन दिल्यानंतरदेखील कोरटकर समोर आला नव्हता. आता त्याचा जामीन फेटाळल्यानंतर त्याला अटक करण्यासाठी कोल्हापूर येथील पोलिसांचे पथक नागपुरात पोहोचले. मात्र, त्याच्या निवासस्थानी तो आढळला नाही. पोलीस पथकाने चंद्रपूर व मध्यप्रदेशमध्येदेखील त्याचा शोध घेतला. बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या मदतीने त्याचा शोध सुरू आहे. नागपूर सायबर पोलीस ठाण्याचीदेखील मदत घेण्यात आली होती. चंद्रपुरातील एका हॉटेलमध्ये प्रशांत कोरटकर मुक्कामी होता. त्यामुळे कोल्हापूर पोलिसांनी चंद्रपुरात छापा घातला. मात्र, काही तासांपूर्वीच त्याला पोलिसांबाबत माहिती मिळाल्याने तो पळून गेला. फॉरेन्सिक लॅब मधील तपासणीसाठी आणि आवाजाचे नमुने घेण्यासाठी कोरटकर यांना अटक होणे गरजेचे होते. मात्र, अंतरिम जामीन मिळाल्याने कोरटकरला अटक करता येत नव्हती. मात्र, तोपर्यंत कोरटकर ज्या वाहनातून तो फिरत होता. त्या वाहनाच्या मागावर कोल्हापूर पोलिसांचे एक पथक होते. कोरटकरने चंद्रपुरातून एका क्रिकेट बुकीच्या कारने पळ काढला. त्यानंतर काही अंतरावर गेल्यानंतर त्याने दुसऱ्या वाहनातून प्रवास सुरू केला. त्यामुळे कोल्हापूर पोलिसांना तपासात अडचणी आल्या. अखेर कोल्हापूर पोलिसांना दुसऱ्या वाहनाचा देखील शोध लागल्याने तेलंगणा येथे जाऊन कोरटकरला बेड्या ठोकल्या.

## मुंबई उपनगर पश्चिमने पार्वतीबाई सांडव चषक पटकावला ! कोल्हापूर ठरला 'श्रीकृष्ण करंडकाचा' मानकरी

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.२४, ठाणे :** कोल्हापूरने पुरुषांत, तर मुंबई उपनगर पश्चिमने महिलांत ७२ व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकावले. महाराष्ट्र राज्य कबड्डी असो.च्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असो.ने विश्वास सामाजिक संस्था व शारदा संकल्प प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले होते. ठाणे पश्चिम येथील कॅडबरी कंपनी जवळील भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी क्रीडांगणार झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात कोल्हापूरने अहमदनगरचा ४२-३२ असा पराभव करीत दोन तपाच्या कालावधीनंतर श्रीकृष्ण करंडक फिरत्या चषकाबरोबर मुख्यमंत्री चषकावर आपले नाव कोरले. शिरोळ, कोल्हापूर येथे २००३ साली झालेल्या स्पर्धेत त्यांनी पुण्याला पराभूत करीत पहिल्यांदा जेतेपदाला गवसणी घातली. पुणे येथे २००४ साली झालेल्या व कराड, सातारा येथे २०१७/१८ साली झालेल्या स्पर्धेत ते उपविजेते ठरले होते. उपविजेत्या अहमदनगरने सलग चौथ्यांदा अंतिम फेरीत धडक दिली. पण फेब्रु. २०२२ साली काल्हेर, भिवंडी, ठाणे येथे झालेल्या स्पर्धेत ते विजेते ठरले होते. नंतर सलग ३वर्ष त्यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागत आहे.





कोल्हापूरने सावध सुरुवात करीत नगर वर पहिला लोण देत विश्रांतीला १८-१३ अशी आघाडी घेतली. कोल्हापूरने विश्रांतीनंतर आपला खेळ अधिक गतिमान केला. त्यांच्या सौरभ फागरे याने एकाच चढाईत ३ गडी टिपत व शिलकी गड्याची पकड करीत दुसरा लोण देत २६-१६ अशी आपली आघाडी वाढविली.पुन्हा त्यांच्या साहिल पाटीलने एकाच चढाईत ४गडी टिपत तिसरा लोण देत आपली आघाडी ३८-२४ अशी भक्कम केली.शेवटची पाच मिनिटे पुकारली तेव्हा ४०-२७ अशी कोल्हापूर कडे आघाडी होती. शेवटी १० गुणांच्या फरकाने कोल्हापूरने आपल्या दुसऱ्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

कोल्हापूरच्या विजयात सौरभ व साहिलला चढाईत ओंकार पाटील तर पकडीत दादासो पुजारी व अविनाश चारपलेची भक्कम साथ लाभली. कोल्हापूरचा संपूर्ण स्पर्धेत बचाव भक्कम झाला. आदित्य शिंदे, सौरभ राऊत यांना चढाईत एकूण १३ बोनस गुण घेतले. पण त्यांचा बचाव अगदीच सुमार दर्जाचा झाला. त्यांच्या पराभवाचे हेच मूळ कारण ठरले. सोमनाथ बेडकेने काही बऱ्या पकडी केल्या.

महिलांच्या अंतिम सामन्यात मुंबई उपनगर पश्चिमने ५-५ चढायांत मुंबई शहर पश्चिमचा प्रतिकार ३३-३२(६-५) असा मोडून काढत पार्वतीबाई सांडव फिरता चषक व मुख्यमंत्री चषक आपल्याकडे खेचून आणला. कराड, सातारा येथे २०१७/१८ साली झालेल्या स्पर्धेत उपनगरने जेतेपद मिळविले होते. त्यानंतर त्यांना हे यश मिळाले. उपनगरेचे या स्पर्धेतील हे तिसरे जेतेपद. सामन्याच्या पहिल्या चढाई पासून चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात पूर्वार्धात १२-११ अशी उपनगर कडे आघाडी होती. उत्तरार्धात उपनगरने शेवटच्या काही मिनिटात सोनालीची पकड करीत मुंबईवर लोण देत आघाडी घेतली. सोनालीची ही पकड चढाईची कालमर्यादा संपल्याने यशस्वी झाली. पूर्ण डावात झालेला हा एकमेव लोण. शेवटी हा सामना २७-२७ असा बरोबरीत संपला. सामन्याचा निकालाकरिता दोन्ही संघांना प्रत्येकी ५-५ चढाया देण्यात आल्या. त्यात उपनगरने चढाईत ५ गुण व पूजा यादवची पकड करीत ६ गुण घेत बाजी मारली. पूजाची पकड मुंबई शहराला पराभवाच्या खाईत घेऊन गेली.

मुंबई उपनगराच्या या विजयाचे श्रेय कोमल देवकर, प्रतिक्षा पन्हाळकर यांच्या संयमी चढाया, तर प्रणाली नागदेवता, करीना पाटील यांच्या भक्कम बचावाला जाते. सोनाली शिंगटे, पूजा यादव, पौर्णिमा जेधे, साधना विश्वकर्मा यांनी मुंबईच्या विजया करिता अखेरच्या क्षणापर्यंत चुरशीची लढत दिली. पण त्यांच्या पदरी निराशा आली. या अगोदर झालेल्या महिलांच्या उपांत्य सामन्यात मुंबई उपनगर पश्चिमने मुंबई शहर पूर्वचा २८-२५ असा, तर मुंबई शहर पश्चिमने पुणे शहरचा ३७-३५ असा पाडाव करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. पुरुषांच्या उपांत्य सामन्यात कोल्हापूरने पुणे ग्रामीणचा ३२-२९ असा, तर अहमदनगरने मुंबई शहर पूर्वचा ३६-२७ असा पराभव करीत अंतिम फेरी गाठली होती.

## नवी मुंबईतील बचत गटांच्या कुरडया, शेवया जाणार सातासमुद्रापार

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२३, ठाणे (नवी मुंबई ) :** नियोजनबद्ध व्यवसाय करणाऱ्या नवी मुंबईतील चार महिला बचत गटांनी तयार केलेले पापड, मसाले, कुरडया आणि शेवया आता सातासमुद्रापार जाणार आहेत. या बचत गटांनी केलेल्या मालाचे वितरण अमेझॉनच्या माध्यमातून जगभर होणार आहे. या चारही बचत गटांना अमेरिकेतील कन्सर्न फाऊंडेशनच्या वतीने गौरवण्यात आले असून त्यांनी प्रत्येकी ३० हजार रुपयांचे अनुदानही देण्यात आले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नवी मुंबई उपजिल्हा संघटक वैशाली घोरपडे यांनी शहरात बचत गटांचे मोठे जाळे उभे केले आहे. त्यांनी शेकडो महिलांना



विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन उद्योजक बनवले आहे. त्यांच्या बचत गटांच्या माध्यमातून नियोजनबद्ध व्यवसाय सुरू आहे. त्याची दखल घेऊन अमेरिकेतील कन्सर्न फाऊंडेशनच्या वतीने आनंदस्वरूप फाऊंडेशनच्या माध्यमातून चालवल्या जात असलेल्या चार बचत गटांचा विशेष सन्मान केला. या बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी कन्सर्न फाऊंडेशनच्या माध्यमातून चारही बचत गटांना प्रत्येकी ३० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले. ऐरोली येथील सावता माळी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या विशेष सोहळ्यात अनुदानाचे धनादेश बचत गटांना वाटप करण्यात आले. या बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे वितरण जगभर करण्यात येणार असल्याचे यावेळी अमेझॉनच्या प्रतिनिधींनी सांगितले.घर आणि संसार सांभाळणाऱ्या महिलांना स्वयंरोजगार करता यावा यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून विशेष प्रयत्न सुरू आहेत. 'एकच ध्यास महिलांचा विकास' हे ब्रीदवाक्य घेऊन शिवसेनेची महिला आघाडी काम करीत आहे. महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जात आहे. या महिलांच्या कलागुणांची आणि नियोजनाची दखल थेट अमेरिकेतील कन्सर्न फाऊंडेशन घेणे ही गौरवाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया उपजिल्हा संघटक वैशाली घोरपडे यांनी व्यक्त केली आहे.

# संपादकीय



## रुपयाची दोन वर्षातील सर्वोत्तम कामगिरी

डॉलरच्या तुलनेत रुपयासाठी सर्वाधिक बळकटी मिळवून देणारा विद्यमान आठवडा हा त्याच्या मूल्यात एक टक्क्यांहून अधिक अशी दोन वर्षात सर्वोत्तम कामगिरी करणारा ठरला. १३ जानेवारी २०२३ नंतरची सर्वाधिक साप्ताहिक वाढ आहे. जागतिक पातळीवर खनिज तेलाच्या स्थिर किमती, डॉलर निर्देशांकातील घसरण आणि रिझर्व्ह बँकेकडून तरलतेला पूरक उपायांसह, परकीय चलन बाजारातील संभाव्य हस्तक्षेप अशा अनेक घटकांमुळे या आठवड्यात भारतीय रुपया डॉलरच्या तुलनेत एक टक्क्यांहून अधिक वधारला आहे. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत शुक्रवारच्या सत्रात रुपया ८६ च्या पातळीपर्यंत मजबूत झाला. सत्रादरम्यान तो ८५.९३ प्रति डॉलर या १० आठवड्यांच्या उच्चांकावर पोहोचला. सलग आठव्या सत्रात डॉलरच्या तुलनेत रुपया मजबूत झाला असून ही त्याची दोन वर्षातील सर्वोत्तम साप्ताहिक कामगिरी ठरली आहे. सरलेल्या आठवड्यात डॉलरच्या तुलनेत तो १.२ टक्क्यांनी वधारला आहे. चालू वर्षात ९ जानेवारी रोजी डॉलरच्या तुलनेत ८५.८६ या पातळीजवळ रुपया होता, त्यानंतर रुपयाची ही सर्वोत्तम पातळी आहे.

गेल्या काही सत्रांपासून रिझर्व्ह बँकेने डॉलर तरलता प्रदान केल्याने आणि चलन बाजारात तिच्या नियमित हस्तक्षेपामुळे रुपया गेल्या काही सत्रांपासून वधारत आहे, असे एचडीएफसी सिक्युरिटीजचे वरिष्ठ संशोधन विश्लेषक दिलीप परमार म्हणाले. तर स्थिर परदेशी गुंतवणूक प्रवाह, खनिज तेलाचे घसरलेले दर, देशांतर्गत नियंत्रित चलनवाढ आणि कमी होत चाललेली व्यापार तूट यामुळेही रुपयाला आधार मिळाला आहे, असे बँक ऑफ बडोदाच्या अर्थतज्ज्ञ आदिती गुप्ता म्हणाल्या.

**व्यापार तुटीत घट**

फेब्रुवारीमध्ये भारताची व्यापार तूट १४.०५ अब्ज डॉलरपर्यंत कमी झाली आहे, ज्यामुळे एकूण व्यापार अधिशेष ४.५ अब्ज डॉलर इतका झाला आहे. जानेवारीमध्ये ही तूट जवळपास २३ अब्ज डॉलर नोंदवली होती. वार्षिक आधारावर, फेब्रुवारी २०२४ मध्ये वस्तूंमधील व्यापार तूट १९.५१ डॉलरच्या तुलनेत कमी झाली. आयातीत घट आणि निर्यात तुलनेने टिकून राहिल्याने फेब्रुवारीमधील तूट ऑगस्ट २०२१ नंतरची सर्वात कमी असल्याचे वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे. फेब्रुवारीमध्ये व्यापारी मालाची निर्यात १०.९ टक्क्यांनी घटून ३६.९१ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे, तर वस्तूंची आयात १६.३५ टक्क्यांनी कमी होऊन ५०.९६ अब्ज डॉलरवर मर्यादित आहे.

# बाजारहाट..!

खेडेगावात साधारणतः रविवार ते शनिवार अर्थात या सात वारांपैकी आठवड्यातून कोणत्याही एका वारी बाजार असतो. तो एक वार गावानुसार निश्चित केलेला असतो. तो वार कसा निश्चित केला असावा ही सांगणे कठीणच..! परंतु आपल्या गावापासून शेजारच्या गावाचा एकाच दिवशी राहत नाही व त्याच्या शेजारच्या गावाचा एका दिवशी राहत नाही. साधारणतः सात ते आठ गावांचा मेळ साधून व्यापारी लोकांच्या सोईनूसार ही प्रथा चालू झाली असावी. असा एक प्राथमिक अंदाज. जेणेकरून एखाद्या व्यापाऱ्याला एका गावाहून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी लागणारा वेळ व आजूबाजूच्या गावांना वस्तू,जिन्नस उपलब्ध व्हावी असा हेतु असावा.व त्यातून बाजाराचा वार ठरला असावा असं वाटतं. अजूनही खेड्यापाड्यातच नाही तर,शहरात सुद्धा आठवडा बाजाराला खूप महत्व आहे.यात माझं गाव कसं सुटेल? माझ्याही गावचा बाजार मंगळवारचा..!

माझ्या गावच्या बाजार म्हणजे खुल्या जागेत भरलेला भव्य शॉपिंग मॉलच जणू...! सर्व प्रकारच्या वस्तू बाजारात उपलब्ध व्हायच्या अन आजही होतात कि ज्या लहान-मोठ्यांपासून आठवड्याभरात मनात साठवून ठेवलेल्या असतात.!शेतीउपयोगी वस्तू, शाळेच्या वस्तू,आंधनाची भांडी, कपडेलत्ते, भाजीपाला असो कि खायचं भातकं..! मग कुटुंबातील सर्वांचा संमिश्र असा हा बाजारहाट....! गोड-धोड खायच्या वस्तु पासून तर जीवन उपयोगी वस्तुपर्यंत कि ज्या आठवड्याभरापासून विकत घ्यायच्या अन तिच्याविषयीची लागून असलेली आस. काही आगळी वेगळीच असायची म्हणून आतुरतेने बाजाराची वाट बघायचो.आई अन बाबा शेतात कामाला जायचे अन त्यातून आम्हां सर्व भावंडा सहित सर्व कुटुंबाच्या गरजा मंगळवारीच पूर्ण व्हायच्या. आठवडाभर कामाला जायचे. आठवड्यात त्यांना एकही सुट्टी नाही परंतु मंगळवारी सकाळी लवकर जाऊन साधारण दुपारच्या दोनला घरी यायचे.अर्थात या ही दिवशी



कामच...! कारण बाजार सुरू व्हायचा दुपारी तीन वाजता भरायचा. याच बाजारहाट साठी आम्ही आतुरतेने वाट बघायचो कारण, या दिवशी आम्हाला आठवड्यापासून आई-बाबांचे शब्द असायचे कि, मंगळवारच्या बाजारहाटासोबत घेऊन देऊ. काही वस्तु हवी असल्यास प्रथम हळूच आईला सांगायचो व नंतर आई बाबाला सांगायची व मग कुठे ती भेटायची.

बाजार सणा-वारानुसार व आवश्यकतेनुसार गच्च भरायचा जसे कि जानेवारी असेल तर, संक्रांतच्या वस्तु साठी बायकांची गर्दी असायची मग बाजार येईल त्या अगोदर पासून मानत साठवून ठेवायची व बाजार दिवशी घायची त्यानंतर लगिणघाई साधारण फेब्रुवारी, मार्च, एप्रिल मे पर्यन्त आहेराचे कपडे असो वा आंधन घेण्यासाठी भांडी असो, आंधन भांड्यामध्ये ताट, पेला, कळशी, हंडा अन जास्त जवळचा असेल तर पंखा अशा किरकोळ वस्तु तरी बाजारात भेटायच्या, त्याहीपेक्षा मोठी हवी असल्यास मात्र शहरवजा खेड्याच्या गावी जावे लागे. पावसाळ्याच्या तोंडावर माझ्या शेतकरी राजाच्या गरजा तर विचारायलाच नको. स्वतःला फाटलेली कपडे घालतील पण मात्र शेती उपयोगी वस्तु मात्र अगोदर घेतील. असा हा त्यांचा बाजार खुरपे, टोपले, पांवडे (खोरे) बैलांसाठी चऱ्हाट,दोऱ्या, आउताच्या वस्तु, पास पुराणे असो व इतर बऱ्याच काही..! त्यानंतर असायचा पोळा. पोळा करी सण करी गोळा अरे बाप रे विचारायलाच नको. नागपंचमी, रक्षाबंधन गर्दीच गर्दी भावासाठी कोणती राखी घेऊ अन कोणती नाही ? त्यानंतर लगेच आवश्यक वस्तु बरोबर जीवन आवश्यक वास्तुसुद्धा. छोट्या-मोठ्या सणांबरोबर दसरा, दिवाळी तर विचारूच नका बाजार अगदी एखाद्या जत्रेसारखा भरायचा कारण कपडे, आकाशकंदील, विजेचे दिवे,फटाके, पणत्या बोळके, सुगंधी उटणे, झाडू खराटे, महालक्ष्मी मूर्ती व इतर धार्मिक वस्तू, नुसती गर्दीच गर्दी अन मजाच मजा....!

बाजारहाट म्हणजे नुसती खरेदीच नव्हती तर खूप समर्पण. मेहनत, तळमळ कसोटीचा असायचा. मुलांसाठी कुतुहलता अन मनातील इच्छापूर्तीची ओढ तर आई वाडिलांसाठी मात्र कसोटी असायची. कधी कधी आठवड्या भरच्या कमाईतून मिळालेल्या रकमे पेक्षा ती वस्तु जास्त किमतीची असायची मग मात्र अशावेळेस खरी कसोटी असायची. हा काळ असायचा साधारणतं: शाळा सुरू होण्याच्या अगोदरचा..! अन एक दिवाळी दसऱ्याचा...! शाळा सुरू होण्याची वेळ साधारण उन्हाळी सुट्टी संपल्यावर जून-जुलै व तोच काळ शेती आवश्यक वस्तु खरेदी करण्याचा. एक पोटाचा तर एक आशेचा..! एक केविलवाण्या चेहऱ्याच्या कुतुहलतेचा, गोड स्वप्नाचा प्रश्न कि जो कित्येक दिवस मनात साठवून ठेवलेला असायचा. बाबा मला गुरूजींनी शाळेसाठी नवीन कपडे सांगितले,नवीन बूट, पुस्तक पेन्सिल पाटी अन दफ्तर मग मात्र बाबा अस्वस्थ व्हायचा अन मुलाला शेजारी बसवून गोड गप्पा सांगायचा, आपण या बाजारले पुस्तक अन कपडे अन पुढच्या बाजाराले बूट घेऊ, तो पर्यन्त जूनं शिव-साव करून घाल,अन मव्ह नाव गुरुजीले सांग बाबा, पुढच्या बाजाराले घेऊन देणार हाय म्हणून मग काय, आनंद गगनात मावत नव्हता. दिवा स्वप्नांचे घोडे गंगेत न्हायाचे अन नवीन गरज,वस्तु भेटण्याची ओढ असायची अन वाट बघायचो पुढील बाजाराची...!

अशा ह्या बाजारहाटाची गोष्ट अगदी जीवनाच्या रहाट गाड्याप्रमाणे प्रमाणे कालही चालू होती, आजही चालू आहे अन उद्याही चालू राहणार अन जीवन जगण्याची रीत अन व्यथा सांगत राहणार. खेड्यातील जीवन भलेही विज्ञान,माहिती तंत्रज्ञान व भौतिक सुखाच्या बाजारात शहराच्या तुलनेत फारसे प्रगत नसेलही मात्र प्रेम, माणुसकी साधेभोळेपणा भावनेच्या बाजारात सरस राहील. या आठवडा बाजारातून खेड्यातील गोर गरीब मजूर, शेतकऱ्याच्या जीवनातील दैनंदिन भेडसावऱ्या समस्या व आहे त्या परिस्थितीत सुख मानून जीवन जगण्याची कला व उद्याचे स्वप्न उराशी बाळगुण त्यासाठी संघर्षमय जीवन जीवनशैलीचं दर्शन घडते.

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ, जि.बुलढाणा**
**मो.९७६३२८२०७७**

# माणूसकीला अस्तित्वात ठेवायचे का नाही?

मानवी जीवनात माणूसकीला फार महत्त्व आहे. ज्या माणसात माणूसकी ठासून भरलेली असते, तो माणूस बावनकशी सोन्यासारखा चकाकतो आणि ज्या माणसात माणूसकीचा लवलेशही नसतो, त्या माणसाचे जीवन जणू राक्षसी वृत्तीचे असते. माणसाला समाजात व गावात जर किंमत आणि मान- सन्मान जर कशामुळे मिळत असेल तर तो माणूसकीमुळेच मिळतो. म्हणून आपण माणूसकीला जिवापाड जपले पाहिजे व माणूसकी आचरणात आणली पाहिजे. पण हल्ली समाजात व गावात वावरत असताना लोकांचा बारकाईने अभ्यास केला तर असे लक्षात येते की, आता माणूसकी फक्त नावालाच उरली आहे. माणूसकीचे अस्तित्व आता संपुष्टात येत आहे. माणूसकी आता गावागावातून हद्दपार होत चालली आहे. कारण माणूसकीला कलंकीत करणाऱ्या कितीतरी घटना रोज भारतात घडत आहेत. हे आपण सोशल मिडिया किंवा वर्तमानपत्रात वाचत आहोत.उघड्या डोळ्यांनी बघत आहोत.

सार्वजनिक ठिकाणी जेष्ठांचा अपमान करण्याची वा ज्येष्ठांना उध्दट बोलण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. एखादा जेष्ठ माणूस रस्त्याने जात असताना त्याची खिल्ली उडवली जात आहे. त्याला टोमने मारले जात आहेत. लोकांच्या आया बहिणी रस्त्याने जात असताना त्यांच्याकडे वाईट नजरेने बघितले जात आहे. महिलांवरील अन्याय अत्याचाराच्या घटना आता वेगाने वाढत आहेत. ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही.महामंडळ बसने प्रवास करताना असे लक्षात येते की, जेष्ठांना, अपंगांना वा अंध व्यक्तींना त्यांच्या आरक्षित जागी कोणीही बसू देत नाहीत. ते तर सोडाच पण हे धडधाकट लोक त्यांची नीट मदत सुध्दा करत नाहीत. प्रसंगी त्यांना खाली बसून जावे लागते. तेव्हा माणूसकी कलंकीत झाल्याशिवाय राहात नाही.रोडवर एखाद्या वाटसरूचा अपघात झाला तर त्यांना रुग्णालयात नेण्याऐवजी त्यांच्या फोटो काढून सोशल मिडियावर व्हायरल करण्यात लोक मश्गूल झालेले असतात. पण त्यांना रुग्णालयात कोणी दाखल करत नाही. उलट बघ्याची भूमिका घेणारे हे निर्दयी लोक तिथून निघून जातात. म्हणून इथे ओशाळतेय माणूसकी असे म्हणावे लागत आहे. पण यदाकदाचित जर चुकून माणूसकीचा अंत झाला तर हा देश बुध्दाच्या नव्हे तर युद्धाच्या मार्गाने जाणार आहे आणि तिसऱ्या महायुद्धाला खतपाणी घालणार आहे. तेव्हा जगाचा विनाश झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आपल्याला माणूसकी अस्तित्वात ठेवणे खूप महत्त्वाचे आहे. म्हणून मित्रहो आपल्याला जर माणूसकी अस्तित्वात ठेवायची असेल तर आपल्याला आपले आदर्श छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचा अभ्यास करून त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. आणि प्रत्येक गावात व समाजात जाऊन माणूसकी पेरण्याचे काम आपण सर्वांनी हाती घेतले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने इथे माणुसकी आनंदाने नांदत राहील. आणि आपला देश आदर्श, बलशाली व शक्तीशाली व जगाची महासत्ता बनेल. फक्त गरज आहे ती प्रत्येकाने माणूसकी पेरण्याची व मानवतावादी कार्य करण्याची....

**- बुध्दभूषण कांबळे, मो.७४९८७१५६६१**

## विद्याविहार येथील इमारतीला भीषण आग

**दि.२४, मुंबई :** विद्याविहार येथील नाथानी मार्गावरील नीलकंठ किंगडम कॉम्प्लेक्सला सोमवारी पहाटे साडेचारच्या सुमारास अचानक आग लागली. या भीषण दुर्घटनेत इमारतीतील सुरक्षारक्षक उदय गांगण (४३) यांचा होरपळून मृत्यू झाला. तसेच, अन्य एक सुरक्षा रक्षक जखमी असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, इमारतीला लागलेली आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी प्रयत्न करत आहेत.

नीलकंठ किंगडम कॉम्प्लेक्समधील तक्षशिला या तेरा मजली इमारतीला सोमवारी पहाटे आग लागली. इमारतीच्या पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर आग लागली होती. सर्वजण साखरझोपेत असल्यामुळे आग लागल्याचे कोणाच्या लक्षात आले नाही. हळूहळू आगीची तीव्रता वाढू लागली आणि सुमारे ५ घरांमध्ये आग पसरली. घरात धूर पसरल्याने गाढ झोपेत असलेल्या रहिवाशांना जाग आली व आरडाओरडा करत त्यांनी अन्य रहिवाशांनाही जागे केले. वाचण्यासाठी त्यांनी इमारतीबाहेर पळ काढला. मात्र, अनेकांना आग आणि धुरामुळे बाहेर पडता आले नाही. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मदतकार्य हाती घेतले.

## नाहक...

अंध विश्वासा बळी
पडे निष्पाप नाहक
प्रथाग्नीत होरफळे
झळा सोसे दाहक

किस्से कथनकरती
कल्पना रूपेभ्रामक
मोठेनावापुरते मोठे
आंतअजाणबालक

डिग्रीमाळ घातल्या
गळ्या बांधे फलक
शिकलेले सरवलेले
बावळटपणाझलक

रे बुध्दीचीगंगाजळी
सरली सर्व शिल्लक
विचारशक्ती खुंटली
क्षमताहो कफल्लक

आधार नसे कृतीला
उत्तरकुठले समर्पक
आमचीचं दिशा पूर्व
बोलणे उद्दाम दर्पक

नवतंत्रज्ञान प्रगतीचे
एकविसावे हे शतक
वृत्ती मागास विचीत्र
आदि मानवी द्योतक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६..**

# वणवे रोखा निसर्गसंपदा वाचवा!

उन्हाळा जसा तापू लागतो तसे वन खात्याच्या जंगलांना आगी लागण्याच्या घटनात वाढ होते. आताही राज्यात कोठेणा कोठे वन खात्याच्या जंगलांना आगी लागून वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. काही वेळा या आगी वेळीच आटोक्यात येतात पण बऱ्याचदा या आगी वेळीच आटोक्यात न आल्याने त्या रौद्र रूप धारण करतात आणि त्याचे रूपांतर मोठ्या वणव्यात होते आणि त्यात बहुमोल अशी निसर्ग संपदा जळून खाक होते. दोन वर्षापूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्याला भीषण आग लागली होती.

जगातील आठ जैवविविधता हॉटस्पॉट पैकी एक असलेल्या पश्चिम घाटाचा हा विस्तिर्ण भाग गोव्याच्या इतिहासातील सर्वात भीषण आगीमुळे उध्वस्त झाला होता. मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील वन खात्याच्या जंगलातही वणवे पेटण्याच्या अनेक घटना घडल्या त्यात शेकडो एकर जंगलातील बहुमोल अशी निदर्गसंपदा जळून खाक झाली होती. वणवा पेटला की त्यात निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी होते. साधारणतः उन्हाळ्यात या आगी लागतात आणि वणव्यांमुळेच या आगी लागतात. सामान्यतः सदाहरित जंगलांमध्ये आगी लागत नाही आग लागली तरी ती आपोआप विझतेही मात्र जोराने वारे वाहत असतील तर आग लवकर विझत नाही उलट ती आणखी वाढते. वनांमध्ये वाळलेले लाकूड, पाने, गवत असे अनेक घटक ठिणगीच्या संपर्कात येताच आग भडकते. मग झाडे पेट घेतात आणि मग मोठ्या वेगाने हा वणवा सर्वत्र पसरतो. डोंगराळ भागाचा भूगोल आणि भूरचना जटिल असल्यामुळेही वणवे विझवण्यात अनेकदा अडथळे येतात. गोव्यात तेच झाले. दुर्गम परिसर आणि खडे चढण यामुळे तेथील आग विझवण्यात अडचण आल्याचे सांगितले गेले. अर्थात जंगलांना आगी लागण्याच्या या घटना नव्याही नाहीत. गेल्या काही वर्षात वणवे लागण्याचे प्रमाण ज्याप्रकारे वेगाने वाढत आहे तो एक नव्या संकटाचा इशारा आहे. नैसर्गिक कारणामुळे जंगलांना वणवे लागण्याच्या घटना तर घडतातातच पण मानवनिर्मित वणवे लागण्याचा घटनांची संख्याही प्रचंड आहे. दरवर्षी उन्हाळा आला की जंगलांना आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यात बहुमोल अशी निसर्गसंपदा नष्ट होते केवळ जंगलांनाच नाही तर डोंगर, पर्वत, टेकड्यांवरील वृक्ष, वेली देखील या वनव्यांनी नष्ट होतात. विविध महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, राज्य व केंद्र शासन, राजकीय, सामाजिक व सेवाभावी संघटना पावसाळ्यात वृक्षारोपण करतात. पावसाळ्यानंतरही ही वनसंपदा जतन करण्यासाठी या संघटना रोपट्यांना पाणी घालून ते वाढवतात. गाई, गुरे, बकऱ्यांपासून त्यांना जपतात. मात्र उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवली गेलेली ही बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराई करिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. ( आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो. ) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्ग संपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्य जीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षाचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावर्णाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे.

असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिसखाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलीस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# टीबी मुक्त ग्रामपंचायतींना २८ कांस्य, १३६ रौप्य मानांकनाने सन्मानित

**अक्षराज : जे. के पोळ**

**दि.२४, ठाणे :** इ. स. १८८२ साली डॉ.रॉबर्ट कॉक यांनी क्षयरोगाच्या जिवाणूंचा शोध लावला. त्यांचा प्रबंध जागतिक शास्त्रज्ञाच्या परिषदेत मांडला व त्यास दि.२४ मार्च रोजी मान्यता मिळवली म्हणून २४ मार्च हा दिवस जागतिक क्षयरोग दुरीकरणाकरिता विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात.

त्यानुषंगाने जिल्हा क्षयरोग केंद्र, ठाणे कार्यालय अंतर्गत दि.२४ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली टीबी मुक्त ग्रामपंचायत अभियानांतर्गत टीबी मुक्त ग्रामपंचायती म्हणुन निवड करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या निर्देशांकानुसार व सहसंचालक आरोग्य सेवा, क्षय व कुष्ठ पुणे यांचे मार्गदर्शक तत्वानुसार एकूण २८ रोप्य प्रशस्तीपत्र देऊन ग्राम पंचायतींना महात्मा गांधी यांचा पुतळा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या शुभ हस्ते देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच १२ निक्षय मित्र व ४ टीबी चॅम्पीयन यांना देखील प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

याप्रसंगी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्ह्यातील एकूण ग्रामपंचायतीमधील २८ कास्य व १३६ रोप्य मानांकन देऊन पुढील वर्षी उर्वरित सर्व ग्रामपंचायती ह्या लवकरच सिल्वर मधून सुवर्ण नामांकन प्राप्त करण्यास प्रयत्न करून ठाणे जिल्ह्यात क्षयरोग हद्दपार करूयात, असे आवाहन केले.

कार्यक्रम हा जिल्हा क्षयरोग केंद्र कार्यालय व जी. एल. आर. ए. इंडिया (जर्मन लेप्रसी एन्ड टीबी रिलीफ असोसिएशन ऑफ इंडिया) या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये एन. के. टी. माध्यमिक ज्युनिअर महाविद्यालयातील २५० मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच नर्सिंग टी एन. के. टी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची टीबी विषयक चित्रकला, रांगोळीच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच टीबी जनजागृती करिता पथनाट्य नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या समोर सादर केला.

जागतिक क्षयरोग दिन नियोजन



भवन सभागृह येथे संपन्न झाला असून नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थिनींची क्षयरोग विषयी विविध जनजागृती रॅली आयोजित करून विद्यार्थी रॅली, पथनाट्य, ऑटो मायकिंग, चित्रकला व रांगोळी स्पर्धा, विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर असे विविध उमक्रम ांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून कार्यक्रम सुरु करण्यात आले असून कार्यक्रमाची प्रास्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. आशा मुंजाळ यांनी केली.

केंद्र शासनाच्या टीबी मुक्त ग्रामपंचायत निर्देशांकानुसार निवड झालेल्या ग्रामपंचायतींचा गौरव सोहळा मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपसंचालक आरोग्य सेवा डॉ. अशोक नांदापूरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, नगराध्यक्ष सुमती पाटील, नगरसेवक किरण भोईर, संत क्लरेट आश्रम बेंडशीळ ता.अंबरनाथ रामभाऊ पातकर, नगराध्यक्ष बदलापुर व निक्षय मित्र, तालुका आरोग्य अधिकारी सर्व, गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, आशा सेविका, निक्षय मित्र, टीबी चॅम्पीयन तसेच कार्यक्षेत्रातील सर्व क्षयरोग कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैद्यकीय अधिकारी डॉ. तरुलता धानके यांनी केले.

# थोडक्यात

## पुण्यात चौथीत शिकणा-या मुलीवर २७ वर्षीय नराधमाकडून लैंगिक अत्याचार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, पुणे :** शाळेत जाण्यासाठी निघालेल्या चौथीतील मुलीवर २७ वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना पुण्यातील वाघोली परिसरात घडली आहे.या प्रकरणातील आरोपीला वाघोली पोलिसांनी अटक केली असून या घटनेमुळे वाघोली परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इयत्ता चौथीमध्ये शिक्षण घेणारी पीडित मुलगी आज सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घरातून शाळेत जाण्यास निघाली. शाळेत जाण्याच्या रस्त्यावर एक पिठाची गिरण होती,त्या पिठाच्या गिरणीत कामाला असलेल्या २७ वर्षीय आरोपीने तिला अडवले, तुला खाऊ देतो असे आमिष दाखवून आरोपीने पीडित मुलीला पिठाच्या गिरणीत घेऊन गेला आणि त्या ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. काही वेळाने गिरणीपासून काही अंतरावर पीडित मुलगी रडत होती.ते रस्त्यावरून जाणार्या येणार्या नागरिकांनी पाहिले.त्यावेळी काही नागरिकांनी तिच्याकडे मुलीकडे विचारपूस केल्यावर तिने घडलेला प्रकार सांगितला.त्यानंतर नागरिकांनी तात्काळ पोलिसांना याबाबत म ाहीती दिली.या घटनेची माहीती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल होऊन आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.या आरोपीकडे वाघोली पोलीस अधिक तपास करीत आहे.

## कन्नडजवळील बिकेट कंपनीला आग; नुकसान मोठे



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, छ.संभाजीनगर :** कन्नड तालुक्यातील चापानेर येथील बिकेट कंपनीला रविवारी सायंकाळी आग लागली. सुमारे तीन ते चार तासानंतर आग आटोक्यात आणण्यात आली.

आग विझवण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथील पदमपुरा केंद्राकडून एक बंब रवाना करण्यात आला. अधिकारी लक्ष्मण कोल्हे यांचे एक पथक घटनास्थळी पोहेचले होते. चापानेर गावच्या अलीकडे बिकेट कंपनीला आग लागल्याचे दशरथ सोमने यांनी अग्निशमन नियंत्रण कक्षाला कळविले. सायंकाळी ४.५५ मिनिटांनी धडकलेल्या माहितीनंतर तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मुख्य अग्निशमन दल पदमपुरा पथकाने आग आटोक्यात आणली. बिकेट कंपनी ही भुश्श्याची गट्टू तयार करणारी आहे. या कंपनीतील आगीच्या घटनेत सुमारे ८० लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. अग्निशमन विभागाच्या एका वाहनासह कन्नड कारखान्याचे एक पाण्याचे टँकरही होते, असे सांगण्यात आले. आग विझवण्यासाठी लक्ष्मण कोल्हे यांच्यासह केतन गाडगे, छत्रपती केकान, महेंद्र खोतकर, विजय कोथमिरे, गोपीचंद मोरे, वाहन चालक नंदकिशोर घुगे यांनी परिश्रम केले.

## खंडाळ्यात बाल कवी संमेलन संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२४, खंडाळा (सातारा) :** जागतिक कवी दिनानिमित्ताने आयोजित केलेल्या तालुक्यातील जिल्हापरिषद प्राथमिक शाळेतील मुलांच्या बालकवी संमेलनास भरघोस प्रतिसाद मिळाला. हा कार्यक्रम किसन वीर सभागृह खंडाळा येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी तालुक्यातील विविध शाळेतील एकुण ८० मुलांनी आपल्या कल्पनेतील कविता उत्कृष्टपणे सादर केल्या. याप्रसंगी या बाल कवीच्या कवितांचा श्रोत्यांनी अगदी मनमुराद आनंद घेतला. यावेळी गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रकाश बोंबले, गटशिक्षणाधिकारी गजानन आडे, संयोजक व शीघ्र कवियत्री सुनिता साबळे, लेखक विकास वरे, जिल्हा शिक्षक संघटनेचे अध्यक्ष मच्छिंद्र ढमाळ, मुख्याध्यापक, शिक्षक व भारमल उपस्थित होते. याप्रसंगी शाळकरी मुलांनी माझा शिवबा राजा, शंभु राजा, गावची शान, खारूताई, पाऊस, चिमणी, बापलेक, आत्मविश्वास, माझी शाळा यासारख्या कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. लहान मुलांनी टाळ्या वाजवून साद दिली. दरम्यान जिल्हयात प्रथमच या बाल कविसंमेलनाचे आयोजन केल्याबद्दल गटविकास अधिकारी अनिल वाघमारे यांनी गटशिक्षणाधिकारी गजानन आडे व शीघ्र कवियत्री केंद्रप्रमुख सुनिता साबळे यांचे विशेष कौतुक केले. यावेळी सर्व सहभागी बालकवी यांना ट्रॉफी व साबळे मॅडम लिखित बहारांकुर काव्यसंग्रह देऊन सन्मानित केले गेले. तसेच सर्व यावेळी मुलांना अल्पोपहार देण्यात आला. यासाठी प्रभाकर सोळसकर, गणेश गाढवे यांनी सहकार्य केले. शेवटी मुख्याध्यापक (मोर्वे) सुजाता सोळसकर यांनी सर्वांचे आभार मानले. शाळकरी मुलांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्यांच्या काल्पनाविस्ताराला चालना देणारा हा उपक्रम केंद्रप्रमुख साबळे यांनी राबविल्याने सर्व अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांनी समाधान व्यक्त केले.

## कोळी मल्हार समाजाचे महासंमेलनाचे आयोजन

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, पालघर :** संपूर्ण आदिवासी मल्हार कोळी आणि कोळी मल्हार समाजाच्या वतीने आयोजित ६ वे महासंमेलन ६ एप्रिल रोजी जोहार कृषी पर्यटन केंद्र, सातिवली (ता. पालघर) येथे संपन्न होणार आहे. या महासंमेलनाचा उद्देश समाजाच्या संस्कृतीचे जतन, शिक्षण आणि रोजगाराची संधी निर्माण करणे. तसेच सहकार चळवळीला चालना देणे असा आहे.मल्हार कोळी आणि कोळी मल्हार समाज हा पारंपरिक संस्कृतीशी जोडलेला असून सामाजिक एकजुटीच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचे उद्दिष्ट या महासंमेलनातून साधले जाणार आहे. समाजातील लोकांनी एकत्र येऊन आपली ओळख, हक्क आणि अधिकार यासाठी काम करणे आवश्यक आहे. हे संमेलन सकाळी १० ते संध्याकाळी ५ पर्यंत चालणाऱ्या या महासंमेलनात विविध तज्ज्ञ आणि समाजसेवक मार्गदर्शन करणार आहेत. महासंमेलनाच्या आयोजकांनी समाजातील प्रत्येक सदस्याने या संमेलनात उपस्थित राहावे आणि समाजहिताच्या दृष्टीने योगदान द्यावे, असे आवाहन केले आहे. या महा संमेलनात पालघर, डहाणू, भिवंडी, वाडा, विक्रमगड, वसई, ठाणे सह मुंबई उपनगरातील आदिवासी कोळी मल्हार समाज उपस्थित राहणार असल्यामुळे या संमेलनाद्वारे समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार असून भविष्यातील विकासाच्या संधींना दिशा मिळणार आहे.

# इंक्रेडिबल प्रीमियम लीग !

जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची सुरुवात २२ मार्च पासून झाली असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती म ोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली.

म्हणजे आज आयपीएलला सतरा वर्ष पूर्ण झाली. या सतरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंगम ुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली. जगभरातील इतर लीग कोरोनामुळे ठप्प झाल्या असताना बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जगापुढे व्यवस्थापनाचा आदर्श घालून दिला. सुरवातीला आठ संघात खेळली जाणारी ही स्पर्धा तीन वर्षापासून दहा संघात खेळली जात आहे. गुजरात टायटन आणि लखनौ सुपर जायंटस या दोन नव्या संघाची आयपीएलमध्ये एंट्री झाल्याने आयपीएलचा थरार आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे यातील गुजरात टायटन या संघाने २०२२ साली पदार्पणातच विजेतेपद मिळवत अनेकांना अचंबित केले इतकेच नव्हे तर २०२३ साली देखील हा संघ अंतिम फेरीत पोहचला म्हणजे पदार्पणाच्या पहिल्या दोन वर्षातच विजेतेपद आणि उपविजेतेपद मिळवत या संघाने आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे. आयपीएलमध्ये दहा संघ असले तरी आयपीएलवर चेन्नई आणि मुंबई या दोन संघाचेच वर्चस्व राहिले आहे. दोन्ही संघाने प्रत्येकी पाच विजेतेपद पटकावित आयपीएलवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या दोघांशिवाय कोलकाता संघाने तीनदा तर हैद्राबाद या संघाने दोनदा विजेतेपद मिळवले आहे. गुजरात या संघाने आपल्या पहिल्याच प्रयत्नात म्हणजे २०२२ ला विजेतेपद मिळविले तर राजस्थान रॉयल या संघाने आयपीएलच्या पहिल्या हंगामात म्हणजे २००८ साली विजेतेपद मिळविले.

बंगळुरू, पंजाब, दिल्ली, लखनौ या सारख्या प्रबळ संघांना मात्र अद्याप एकदाही विजेतेपदाला गवसणी घालता आलेली नाही यावर्षी आयपीएलला नवा विजेता मिळेल का ? याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना लागली आहे. अर्थात यावर्षीही चेन्नई आणि मुंबई हेच दोन संघ विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. याशिवाय कोलकाता, बंगळुरू आणि गुजरात हे देखील विजेतेपदाच्या शर्यतीत आहेत. कदाचित यावेळी एखाद्या नव्याच संघाने विजेतेपद पटकावून सर्वांना अचंबित केल्यास आश्चर्य वाटायला नको. या वेळेची स्पर्धा एका नव्या कारणाने देखील चर्चेत आहे ती म्हणजे या वेळी अनेक संघांनी आपले कर्णधार बदलले आहे. आयपीएलमध्ये सहभागी असलेल्या दहा पैकी ९ संघांनी कर्णधारपदी




भारताच्या युवा खेळाडूची निवड केली आहे. फक्त हैद्राबाद या संघाने कर्णधार म्हणून ऑस्ट्रेलियाच्या पॅट कमिन्सची निवड केली. उर्वरित नऊ संघाचे कर्णधार भारतीयच आहेत. ज्या धोनी आणि रोहित शर्माने आपल्या संघाला पाच विजेतेपद मिळवून दिले त्यांना यावेळी फक्त खेळाडू म्हणून मैदानात उतरावे लागेल कारण मुंबईच्या संघ व्यवस्थापनाने रोहित शम ्च्या जागेवर हार्दिक पांड्याची कर्णधार म्हणून निवड केली आहे. तर धोनीने स्वतः कर्णधार पदाचा त्याग केल्याने युवा ऋतुराज गायकवाडच्या गळ्यात चेन्नईच्या कर्णधारपदाची माळ पडली आहे.

आरसिबी अर्थात बंगळुरू संघाने अनुभवी विराट कोहलीच्या जागी युवा रजत पाटीदारला संधी देत त्याच्याकडे बंगळुरू संघाचे नेतृत्व सोपवले आहे. गुजरात संघाच्या कर्णधार पदाची धुरा युवा शुभमन गीलच्या खांद्यावर आहे. मागील वर्षी कोलकाताचा कर्णधार असलेला आणि कोलकाताला तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवून देणारा युवा श्रेयस अय्यर यावेळी पंजाबचा कर्णधार बनला आहे तर म राठमोळा अजिंक्य रहाणे कोलकाताची धुरा सांभाळणार आहे. जीवघेण्या अपघातातून बचावलेला ऋषभ पंत लखनौचा कर्णधार आहे. संजू सॅमसन या युवा खेळाडूकडे राजस्थानची जबाबदारी आहे तर युवा अक्षर पटेल पहिल्यांदाच दिल्लीचे नेतृत्व करणार आहे.भारताच्या या युवा खेळाडूंवर कर्णधार पदाची जबाबदारी देऊन संघ मालकांनी त्यांच्यातील नेतृत्व गुणाला चालना दिली आहे. याच युवा खेळाडूंपैकी एखादा खेळाडू भविष्यात भारतीय संघाचे नेतृत्व करू शकतो म्हणजे भविष्यातील भारतीय संघाच्या कर्णधाराची पायाभरणी याच आयपीएल मधून होणार आहे. केवळ कर्णधारच नव्हे भविष्यातील संपूर्ण भारतीय संघच आयपीएल मधून निवडला जाईल.

आज जे खेळाडू भारतीय संघात दिसतात ते सर्व खेळाडू आयपीएल मधूनच पुढे आले आहेत. भारतीय संघातील रविंद्र जडेजा, सूर्यकुमार यादव, शूभमन गिल, यशस्वी जयस्वाल, श्रेयस अय्यर, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, यजुवेंद्र चहल, वॉशिंगटन सुंदर, मोहंमद सिराज, मोहंमद शमी, संजू सॅमसन, ईशान किशन, ऋषभ पंत, वरुण चक्रवर्ती, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल असे सर्वच खेळाडू आयपीएलची देण आहे. आयपीएलमध्ये चांगली काम गिरी केल्यानेच या खेळाडूंना भारतीय संघात प्रवेश मिळाला. आयपीएल म्हणजे भारतीय संघात प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे त्यामुळेच आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी खेळाडू मैदानावर घाम गाळतात. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करून भारतीय संघात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न सारे खेळाडू पाहतात ते स्वप्न यशस्वी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात त्यामुळेच आयपीयलचे सर्व सामने रंगतदार होतात आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येतो. यावर्षीही आयपीएलचे सर्व सामने रंगतदार होतील आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येईल यात शंका नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# विज्ञान कुतूहल भवनला विद्यार्थ्यांची भेट...

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२४, माटुंगा :** विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक संकल्पना रुजाव्या, विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, विज्ञान म्हणजे काय?विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल जागृती निर्माण व्हावी,वैज्ञानिक विचार करण्याची क्षमता निर्माण व्हावी, माणसाचं अस्तित्व खरंच विज्ञानाच्या अस्तित्वामुळे आहे का?तसेच विज्ञान, खगोल, भूगोल या विषयांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळावी या अनुषंगाने विज्ञान,भूगोल व खगोल या विषयांच्या विविध शैक्षणिक प्रतिकृती व वर्किंग मॉडेल्स दाखविण्यासाठी चेंबूर कॅम्प मनपा इंग्रजी उ.प्रा. शाळेतील इयत्ता सहावी, सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांकरिता विज्ञान सहल ही विज्ञान कुतूहल भवन उपक्रम,सिटी ऑफ लॉस एंजिल्स मनपा शाळा, माटुंगा येथे नुकतीच बृहन्मुंबई म हानगरपालिका शिक्षण विभाग,एम /पश्चिम,चेंबूर यांच्याद्वारे कुतूहल सहल आयोजित करण्यात आली होती. या विज्ञान सहलीच्या माध्यमातून इयत्ता सहावी,सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी म ाटुंगा मुंबई येथील विज्ञान कुतूहल भवनाला भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांसोबत इयत्ता सहावी, सातवी व आठवीचे वर्गशिक्षकही होते. विज्ञान कुतूहल भवनमध्ये विज्ञान विषयाची विविध प्रकारची वर्किंग मॉडेल्स, विज्ञान प्रतिकृतीची मांडणी केलेली होती.मॅजिक सायन्स ले, पेरिस्कोप, जादुई नळ, रिफ्लेक्शन ऑफ लाईट, चलचित्र सिनेमा, हायड्रो इलेक्ट्रिसिटी,फनी मिरर, रेनबो इत्यादी प्रयोगीक साधने प्रत्यक्ष पाहायला व अनुभवायला मिळाले. विज्ञान कुतूहल भवनातील विविध प्रकारच्या वर्किंग मॉडेल तसेच विज्ञान प्रतिकृतीची प्रात्यक्षिक दाखवण्यापूर्वी विज्ञान भवनातील तज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाबद्दल अतिशय चांगले म ार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांची चार ते पाच समुह तयार करून विद्यार्थी समुहातील प्रत्येक विद्यार्थ्याला तज्ञ मार्गदर्शकांनी विज्ञान भवनामध्ये ठेवलेल्या प्रत्येक विज्ञान प्रतिकृतीची, वर्किंग मॉडेलची प्रात्यक्षिक करून दाखवली व विद्यार्थ्यांना पडलेल्या प्रत्येक प्रश्नांची उत्तरे दिली. तसेच विद्यार्थ्यांनी काही प्रात्यक्षिक सुद्धा स्वतः करून बघितली. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचार, विज्ञानाबद्दल माहिती, सर्जनशीलता,वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत झाला तसेच या विज्ञान सहलीचा फायदा इयत्ता सहावी,सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांना झाला व विज्ञान भवनामध्ये आलेला वैज्ञानिक अनुभव व केलेल्या प्रात्यक्षिक अनुभवातून अनेक विद्यार्थ्यांनी विज्ञान प्रतिकृती, वर्किंग मॉडेल्स बनवण्याचा प्रयत्न केला. या विज्ञान सहलीमध्ये विद्यार्थ्यां समवेत इयत्ता सहावी, सातवी व आठवी चे वर्गशिक्षक हेमंत शेंडे, सुनील गायकवाड, दत्तात्रय गावडे व कानन देसाई उपस्थित होते.